MHKO100001072014

## नियमित दिवाणी दावा क्र. ५१/२०१४ निशाणी क्र. ६० वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता याचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केले नाही.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा दाखल करतेवेळी अपु-या माहितीमुळे प्रतिवादी क्र. ६ चे नांव द्रौपदी आप्पाजी पाटील ऐवजी तानुबाई बाबु गुरव असे चुकीचे नमूद झाले आहे. सदरची माहिती वादी यांना प्रतिवादी क्र. ६ च्या मृत्यू दाखल्यावरुन समजून आली आहे. त्यामुळे सदरचे दावेचे कामी कोणतीही तांत्रिक अडचण राहून नये म्हणून प्रतिवादी क्र. ६ चे नावात दुरुस्ती करणे आवश्यक व गरजेचे आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**४.** वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यानी आपल्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, दावा दाखल करतेवेळी अपु-या माहितीमुळे प्रतिवादी क्र. ६ चे नांव द्रौपदी आप्पाजी पाटील ऐवजी तानुबाई बाबु गुरव असे चुकीचे नमूद झाले आहे. सदरची माहिती वादी यांना प्रतिवादी क्र. ६ च्या मृत्यू दाखल्यावरुन समजून आली आहे. त्यामुळे सदरचे दावेचे कामी कोणतीही तांत्रिक अडचण राहून नये म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची असलेने मंजूर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार

नाही. उलटपक्षी प्रस्तावित दुरुस्तीमुळे अंतिम न्यायनिर्णय करणेस व दाव्यातील गुंतागुंत कमी करणेस मदत होणार आहे. परंतु वादी यांनी सदरची दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतर ब-याच दिवसांनी मागीतली असल्याने त्यांचे काहीअंशती खर्च बसविणे आवश्यक आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**१.** वादी यांचा निशाणी क्र. ६० चा अर्ज प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी दाव्यात निशाणी क्र. ६० च्या अनुषंगाने १४ दिवसाचे आत नियोजीत दुरुस्ती करावी व दाव्याची दुरुस्त प्रत सत्वर अभिलेखावर दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:13:21 +0530

**ठिकाणः- गडहिंग्लज**
**दिनांक - २३/०१/२०२३**

**(म. ता. खराडे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**गडहिंग्लज**